Maharashtra State Board Of
Secondary & Higher Secondary
Education
Latur Divisional Board

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर- ४१३५३

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर
Divisional Chairman Ph :( O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क.लाविमं/माध्य.अ/ 1014 दिनांक :- 31/07/2025

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/
उच्च माध्य. महाविद्यालये,
लातूर/नांदेड/धाराशिव.

**विषय** :– फेब्रुवारी–मार्च 2026 मध्ये होणा–या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेपासून नविन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत.

**संदर्भः**– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क.रा.मं/परीक्षा–8/3865 दि.23.07.2019

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.12 वी ) फेब्रु./मार्च 2026 परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास नवीन परीक्षा केंद्र निर्मीतीसाठी मंडळाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव **दि.31.08.2025** पर्यंत मागविण्यात येत आहेत, नविन परीक्षा केंद्राची आवश्यकता असल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे आहे त्यांनी प्रथम प्रस्ताव फॉर्मची मंडळाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात यावी व फॉर्म शुल्क रू 1000/–(रु.एक हजार फक्त) मंडळाकडे भरून प्रस्ताव फॉर्म विकत घेण्यात यावा.

**<u>नवीन परीक्षा केंद्र प्रस्तावासोबत खालील बाबींची पुर्तता करून आवश्यक सर्व कागदपत्रे व प्रपत्रे जोडावीत</u>.**

1. नवीन परीक्षा केंद्राची मागणी करणा–या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा केंद्र घेणेबाबत पालक, शिक्षक, व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करण्यात यावा. तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या केंद्रास जोडावयाच्या आहेत. त्या शाळा/क. महाविद्यालयातील पालक, शिक्षक, व्यवस्थापन चा ठराव सादर करण्यात यावा.
2. ज्या संस्था किंवा शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या परीक्षा केंद्रास सलग्न होणार आहेत अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे संमतीपत्र व हमीपत्र स्टॅम्प पेपरवर घेणे आवश्यक आहे. स्टॅम्प पेपरवर प्रस्तावासोबत सादर करावयाचा हमीपत्राचा नमुना प्रस्तावासोबत जोडलेला आहे.
3. प्रस्तावित नविन केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जनरेटर व इतर सर्व भौतिक सोईसुविधा असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे हमीपत्र स्वतंत्र सादर करण्यात यावे. तसेच गुगल मॅप तालुक्याचा नकाशा सादर करण्यात यावा.

**4.** परीक्षा केंद्रावर समाविष्ठ होणा–या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या कमीत कमी 2 असावी व त्या एकाच संस्थेच्या नसाव्यात. नवीन मान्यता मिळालेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास **दोन वर्षापर्यंत परीक्षा केंद्र घेता येणार नाही.**

5.परीक्षा केंद्र निर्माण केल्यास मूळ परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी संख्येवर परिणाम होत नसल्याबाबत मूळ केंद्राचे (मुख्याध्यापक/प्राचार्य) हमीपत्र व नाहरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

6. गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.कार्यालय लातूर/धाराशिव/नांदेड यांचे स्वतंत्र लेखी अभिप्राय व शिफारस पत्र सादर करणे आवश्यक आहे.

7. परीक्षा केंद्रावर इयत्ता **12 वी** शहरी भागासाठी 300, ग्रामीण भागासाठी 250 व अतिदुर्गम भागासाठी 150 ते त्यापुढील संख्येत विद्यार्थी प्रविष्ठ होणे आवश्यक आहे.

8. परीक्षा केंद्रावर इयत्ता **10 वी** शहरी भागासाठी 250, ग्रामीण भागासाठी 200 व अतिदुर्गम भागासाठी 125 ते त्यापुढील संख्येत विद्यार्थी प्रविष्ठ होणे आवश्यक आहे.

9. केंद्र प्रस्तावासोबत ना परतावा छाननी शुल्क **रू.10,000/–**(रु.दहा हजार फक्त) कार्यालयात जमा करावी व त्याची पावती प्रस्तावासोबत सादर करावी. सदरचे छाननी शुल्क परत करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

अपुर्ण प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर प्रस्ताव या कार्यालयास विनाविलंब **दि.31.08.2025**पर्यंत हस्तपोच पाठवावा,

**केंद्र निर्मितीचा प्रस्ताव विहीत दिनांकापर्यंत सादर करावा मुदतीनंतर येणारा प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.**

विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ, लातूर

<u>प्रत माहीतीस्तव</u>
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
लातूर/धाराशिव/नांदेड